**रे. दि. मु. क्रमांक २१७/२०१४ मधील नि.क्र. ३४ व ३९ खालील आदेश.**
**बाळू साधू काळे विरुध्द विठ्ठल भागू काळे व इतर**
**आदेश पारित दिनांक ०८.०८.२०२२**

---

प्रस्तूतचा अर्ज वादीतर्फे वारस यांनी मयत वादी बाळू साधू काळे व प्रतिवादी क्र. १ विठ्ठल भागू काळे यांचे वारस कायदेशीर वारस म्हणून अभिलेखावर नोंद होणेकरिता दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तूत अर्जामध्ये असे कथन करणेत आले आहे की, प्रस्तूतचा दावा प्रलंबित असताना वादी बाळू साधू काळे हे दिनांक २७/०४/२०१९ रोजी मयत झाले आहेत. मयत वादी यांना १–अ ते १–ड हे वारस आहेत. तसेच प्रतिवादी क्र. १ विठ्ठल भागू काळे हे दिनांक २२.०१.२०२१ रोजी मयत झाले आहेत. मयत प्रतिवादी क्र. १ यांना १–अ ते १–ड हे वारस आहेत. उपरोक्त नमूद वारसांची नोंद अभिलेखावर व्हावी, तसेच, प्रस्तूतची दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची असून त्यामुळे दाव्याच्या सरनाम्यामध्ये कोणताही बदल होत नाही. करिता मयत वादी व मयत प्रतिवादी क्र. १ यांच्या वारसांच्या नावांची नोंद अभिलेखावर व्हावी अशी विनंती करणेत आली आहे.

०३. प्रस्तूत अर्जावर प्रतिवादींतर्फे निशाणी क्र. ३८ वर असे म्हणणे दाखल की, वादीने दिलेला निशाणी क्र. ३४ चा अर्ज व त्यामधील मजकूर बरोबर नाही. वादीने दिलेला अर्ज मुदतीत नाही. त्यामुळे वादीचा अर्ज फेटाळण्यात यावा. यदाकदाचित अर्ज मंजूर करणेचा झालेस योग्य तो कॉस्टचा हुकूम व्हावा. तसेच वारंवार संधी देवून देखील प्रतिवादींतर्फे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे वादीचा निशाणी क्र. ३९ चा अर्ज प्रतिवादींविरुध्द विना म्हणणे चालविण्याचा आदेश पारित करण्यात आला.

०४. वादीचे प्रस्तूत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत वादी बाळू काळे यांना १–अ ते १–ड असे वारस आहेत. तसेच मयत प्रतिवादी क्र. १ यांना

१–अ ते १–ड असे वारस आहेत. मयत वादी व मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सदर दाव्यामध्ये दाव्याचा गुणदोषावर निकाल देणेकामी मयत वादी व मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. वरील कारणांचा विचार करून खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादीचे निशाणी क्र. ३४ व ३९ चे अर्ज मंजूर करणेत येतात. |
| २. | वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेली दुरुस्ती विहीत कालावधीमध्ये करावी व त्याप्रमाणे दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करणेत यावी. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

KARUNA AMRUTRAJ PATTEBAHADUR

Digitally signed by KARUNA AMRUTRAJ PATTEBAHADUR
Date: 2022.08.08 17:06:19 +05'30'

(के. ए. पट्टेबहादुर)

दिनांक – ०८.०८.२०२२		सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खंडाळा.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर हा मुळ आदेशाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

न्यायालयाचे नाव – सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, खंडाळा

लघुलेखकाचे नाव – कु. एन. एम. भोसले

(एन. एम. भोसले)
लघुलेखक